CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | मंगळवार, २४ डिसेंबर २०२४

अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाने सोमवारी घणसोली नोडमधील अनधिकृत आरसीसी इमारतीच्या बांधकामावर धडक कारवाई केली. हे अनधिकृत इमारतींचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.

घणसोली सेक्टर-२० येथील सर्व्हे नं. ४७ या मोकळ्या भूखंडावर जयंत पाटील यांनी अनधिकृत आरसीसी फ्लेन्थचे बांधकाम सुरू केले होते. या इमारतीच्या अनधिकृत बांधकामास सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने नोटीस बजावली होती. त्यानुसार संबधितांनी हे अनधिकृत बांधकाम थांबविणे गरजेचे होते. मात्र त्यानंतरही त्या इमारतीचे बांधकाम सुरूच ठेवण्यात आले होते. त्यामुळे सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या पथकाने धडक कारवाई करून ते बांधकाम जमीनदोस्त केले.

सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून सिडकोची कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता हे बांधकाम उभारण्यात आल्याने त्याविरोधात कारवाई करण्यात आल्याचे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सांगितले. ही मोहीम मुख्य दक्षता अधिकारी यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

घणसोलीत सिडकोची कारवाई

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, मंगळवार, २४ डिसेंबर २०२४
मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

घणसोली येथील अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त; 'सिडको'ची कारवाई

नवी मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी

'सिडको'च्या मोकळ्या भूखंडावर उभ्या राहत असलेल्या अनधिकृत बांधकामांविरोधात 'सिडको'च्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. सोमवार, दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी घणसोली येथे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करून ते जमीनदोस्त केले.नवी मुंबईतील 'सिडको'च्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम करून भूखंड हडप करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर

घडत आहेत. याला आळा घालण्यासाठी 'सिडको'चे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिडको'च्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने कारवाई सुरु केली आहे. घणसोली सेक्टर-१६ येथील सर्व्हे क्र. ४७ या भूखंडावर 'सिडको'ची परवानगी न घेता जयंत प्रभाकर पाटील यांनी इमारतीचे आरआरसी बांधकाम सुरू केले होते. सोमवारी सकाळी 'सिडको'च्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या पथकाने कारवाई करून हे बांधकाम जमीनदोस्त केले.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ | ठाणे

घणसोलीतील अनधिकृत बांधकाम सिडकोने केले जमीनदोस्त

| नवी मुंबई : सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर उभ्या राहत असलेल्या अनधिकृत बांधकामांविरोधात सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. त्या मोहिमेअंतर्गत सोमवारी सकाळी घणसोली येथे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करून ते जमीनदोस्त करण्यात आले.

नवी मुंबईतील सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम करून भूखंड हडप करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. याला आळा घालण्यासाठी सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने कारवाई सुरू केली आहे. घणसोली सेक्टर-१६ येथील सर्व्हे क्रमांक ४७ या भूखंडावर सिडकोची परवानगी न घेता जयंत प्रभाकर पाटील यांनी इमारतीचे आरआरसी बांधकाम सुरू केले होते. सोमवारी सकाळी सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या पथकाने कारवाई करून ते जमीनदोस्त केले.